Pune Police

प्रेस नोट दिनांक १६/३/२०१९

**पुणे शहरातील वेगवेळगळ्या पार्किंग मधुन दुचाकी मोपेडचे डिक्कीतुन पैसे व मौल्यवान वस्तु चोरुन स्वता:चे बँक खात्यामध्ये लोखो रुपये जमावणारे चोरट्यास गुन्हे शाखा,युनिट – ४ ने शिताफिने केली अटक.**

---

पुणे शहरात गेले दोन वर्षापासुन बँक, शॉपींग मॉल,मार्केट अशा गर्दिच्या ठिकाणी पार्किंगमध्ये पार्क केलेल्या ॲक्टिव्हा, ॲक्सेस, ज्युपिटर मोपेड च्या डिक्कीतुन रोख रक्कमा,सोने अशा मौल्यवान वस्तु चोरीचे घटना घडत होत्या. त्या अनुषंगाने मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.प्रदिप देशपांडे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे -२, श्री. भानुप्रताप बर्गे यांनी अशा प्रकारचे गुन्हे करणारे आरोपीच्या कार्यप्रणाली बाबत माहीती घेवुन त्यास शोधणे बाबत मार्गदर्शन केले होते.

वरिष्ठांनी केले मार्गदर्शनाचे अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट ४ कडुन गुन्हेगाराचा शोध चालु असताना कर्मचारी **पो.ना.रमेश चौधर व पो.ना. निलेश शिवतरे** यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की रेकार्डवरील गुन्हेगार बाबा बनपट्टे रा.वडारवाडी पुणे याने सुमारे तीन आठवड्यापुर्वी नानापेठ पुणे येथील एका बिल्डींगचे पार्किंग मधुन ॲक्टिव्हा डिक्की उचकटुन पैसे चोरलेले आहेत अशी बातमी मिळाली. त्या आरोपीचा शोध घेत असता मिळालेल्या सी.सी.टि.व्ही फुटेज वरुन खात्री करुन आरोपी नामे सुभाष उर्फ बाबा लक्ष्मण बनपट्टे रा.जय मित्र मंडळाजवळ, वडारवाडी पुणे यास वडारवाडी भागात सापळा रचुन दिनांक १३/२/२०१९ रोजी ताब्यात घेतले व समर्थ पो.स्टे.गु.र.नं. ६०/२०१९ भा.द.वि.कलम ३७९ मध्ये त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक केली.

अटक मुदतीत त्याचेकडे अधिक तपास करता त्याचेवर यापुर्वी बरेच गुन्हे नोंद असल्याचे व सदर गुन्हयातुन जामीनवर सुटलेनंतर पुणे शहरात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे खालील नमुद गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले.

१. शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.न. ३३१/२०१७ भा.द.वि.कलम ३७९
२. डेक्कन पोलीस स्टेशन गु.र.नं.१६/२०१८ भा.द.वि.कलम ३७९
३. अलंकार पोलीस स्टेशन गु.र.नं. १०४/२०१८ भा.द.वि.कलम ३७९
४. सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं. २४१/२०१७ भा.द.वि.कलम ३७९
५. बिबवेवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. २८०/२०१७ भा.द.वि.कलम ३७९
६. लष्कर पोलीस स्टेशन गु.र.नं. २०७/२०१७ भा.द.वि.कलम ३७९
७. बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.र.नं.३९९/२०१७ भा.द.वि.कलम ३७९
८. बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.र.नं.१८०/२०१७ भा.द.वि.कलम ३७९
९. समर्थ पोलीस स्टेशन गु.र.नं. १३०/२०१८ भा.द.वि.कलम ३७९
१०. येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ७८२/२०१८ भा.द.वि.कलम ३७९
११. विमाननगर पोलीस स्टेशन गु.र.नं. १००/२०१९ भा.द.वि.कलम ३७९.
१२. समर्थ पोलीस स्टेशन गु.र.नं.६०/२०१९ भा.द.वि.कलम ३७९

असे गुन्हे १२ गुन्हे केल्याचे उघडकीस आले.

आरोपी हा गुन्हे केले नंतर चोरीचे मिळालेल्या रक्कमेपैकी काही रक्कम तो खर्च करुन राहीलेली रक्कम काही दिवस घरात ठेवुन नंतर तो ती रक्कम थोडी थोडी करुन बँकेत स्वता:चे खात्यावर भरत होता.अशा प्रकारे त्याने लाखो रुपये जमविल्याचे आढळुन आले आहे.त्याचे एका बँकेतील ४ लाख रु हस्तगत करणेत आले असुन बंडगार्डन पोलीस स्टेशन हद्दीतील ससुन हॉस्पीटल पुणे येथुन सुध्दा एका दुचाकी मोपेड मधील कि.रु. २०,०००/- चा एक लॅपटॉप जप्त केला आहे. तसेच रोख रक्कम ७०००/- रु